## इस्राईलचा गाझात एअर स्ट्राईक; मीडियाची कार्यालये असलेली इमारत कोसळली

◆**गाझा :** इस्राईलच्या सैन्याने शनिवारी गाझा येथे एअर स्ट्राईक केला असून यात मीडियाची ऑफिसेस असलेली एक इमारत कोसळली. या इमारतीमध्ये असोसिएटेड प्रेस आणि अल-जझीरा आदी मीडिया नेटवर्कची कार्यालये होती. तसेच या इमारतीत निवासी घरेही होती. इस्राईलच्या सैन्याने ही इमारत रिकामी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर साधारण तासाभराने त्यांनी एअर स्ट्राईक केला आणि यात ही संपूर्ण इमारत कोसळली. गेल्या सोमवारपासून गाझा पट्टीमध्ये सुरू असलेल्या रॉकेट हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी होऊ लागली आहे. यात लहान मुले आणि महिलांचाही समावेश आहे. या काळात १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. शनिवारी करण्यात आलेल्या एअर स्ट्राईकमध्ये १२ माळ्याची इमारत कोसळली. परंतु, इस्राईलने याच इमारतीला लक्ष्य का केले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, एअर स्ट्राईक करण्याआधी इस्राईलच्या सैन्याने दुपारी या इमारतीच्या मालकाला फोन करून ताकीद दिली होती.

# मूकबधिर, दिव्यांगांसाठी विशिष्ट मास्क असणे गरजेचे!

## न्यायालयाचे सरकारला आदेश

◆**मुंबई :** कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव टाळण्यासाठी मास्कचा वापर अनिवार्य केला आहे. मात्र, मूकबधिर आणि गरिबांना वापरण्यासाठी मास्क मिळत नसल्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची दखल घेत मूकबधिर नागरिकांसाठी विशिष्ट मास्क असायला हवे, असे स्पष्ट त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आतापर्यंत कोणकोणती पावले उचलली त्याची माहिती सादर करण्याचे निर्देश खंडपीठाने राज्य सरकारला दिले.

कोरोनाला रोखण्यासाठी मास्क आवश्यक असतानाही सर्वसामान्य नागरिक मास्कचा वापर करत नाहीत. म्हणून विनामास्क फिरणाऱ्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. मात्र, दंड आकारणीमध्ये पारदर्शकता नसल्याचा आरोप



करणारी जनहित याचिका 'लोकशाहीवादी बाळासाहेब सरोदे स्मृती प्रबोधन उपक्रम' यांच्यामार्फत ॲड. असीम सरोदे यांच्यासह ॲड अजिंक्य उडाणे, ॲड. अजित देशपांडे यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर मुख्य न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर व्हीसीमार्फत सुनावणी पार पडली. कोरोना काळात रस्त्यावर फिरताना मूकबधिर नागरिकांच्या तोंडावर विशेष मास्क असणे गरजेचे आहे. त्यांना ओळखण्यासाठी त्या मास्कवर विशिष्ट लोगो असणे आवश्यक आहे. गरीब, बेघर, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांसाठी मोफत मास्कचे वाटप करणे आवश्यक आहे. तसे केल्यास त्यांच्याकडून होणारा कोरोना प्रसार रोखण्यास मदत होईल, असा युक्तिवाद ॲड. असीम सरोदे यांनी खंडपीठासमोर केला. त्यांची बाजू ऐकून घेत न्यायालयाने राज्य सरकारला याकडे लक्ष देण्यास सांगितले.

# 'तौत्के' चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर महावितरणला सज्ज राहण्याच्या सूचना

◆**कल्याण :** अरबी समुद्रातील 'तौत्के' चक्रीवादळाचा मुसळधार पावसासह मोठा तडाखा राज्यातील कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांना बसणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमिवर वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणची यंत्रणा युद्धपातळीवर सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्यासाठी आपत्कालीन आराखडा तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे युद्धपातळीवर काम करण्यात यावे, असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिले आहे.

अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने 'तौत्के' चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे वेगवान वादळासह मुसळधार पावसाचा मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आदी जिल्ह्यांना तडाखा बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या जिल्ह्यातील वीजयंत्रणेला मोठा धोका निर्माण झाला आहे. सध्या कोरोना प्रादुर्भावामुळे महावितरणची यंत्रणा सुरळीत वीज पुरवठ्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहे. मात्र या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर महावितरणने कर्मचाऱ्यांसाठी 'हाय अलर्ट' जाहीर केला असून सर्व अभियंता व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. या चक्रीवादळाला तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर ताबडतोब पूर्वतयारी सुरु करण्याचे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी दिले आहे.

चक्रीवादळ व मुसळधार पावसामुळे वीजयंत्रणेचे कमीतकमी नुकसान व्हावे, यासाठी पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. सोबतच महत्वाचे उपकेंद्र आणि भांडार केंद्रांमध्ये आवश्यक यंत्रसामग्रीचा साठा करून ठेवण्यात येत आहे. यामध्ये विजेचे खांब, रोहित्र, वीजतारा, ऑईल व इतर तांत्रिक साहित्याचा समावेश आहे. यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी नियुक्ती करण्यात आलेल्या सर्व एजन्सीजना आवश्यक मनुष्यबळ, सामग्री व वाहनांसह तयार राहण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यास सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरळीत करण्यात येणार आहे.सोबतच यंत्रणा दुरुस्तीचे काम देखील युद्धपातळीवर करण्यात येणार आहे. सध्या कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे प्रामुख्याने मोठे व कोविड रुग्णालये, ऑक्सीजन निर्मिती प्रकल्प व रिफीलिंग उद्योग, विलगीकरण कक्ष, लसीकरण केंद्रे, पाणीपुरवठा, मोबाईल टॉवर्स, रेल्वे व अत्यावश्यक सेवेसह घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

## कोरोनामुळे आरोग्य विद्यापीठाच्या परीक्षांबाबत फेरप्रस्ताव पाठवा

◆**मुंबई :** कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील कडक निर्बंध १ जूनपर्यंत वाढविले असल्याने आरोग्य विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या २ जूनपासून सुरु होणाऱ्या परीक्षांबाबत चर्चा करुन फेरप्रस्ताव शासनास पाठवावा असे निर्देश विद्यापीठाचे प्रति-कुलपती तथा वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी दिले.

### वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांचे निर्देश

वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १४ मे रोजी परीक्षांच्या वेळापत्रकांबाबत आढावा बैठक ऑनलाईन पध्दतीने झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव विजय सौरभ, विद्यापीठाचे प्रभारी-कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालाचे संचालक डॉ. तात्याराव लहाने, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण, परीक्षा नियंत्रक डॉ. अजित पाठक विद्यापीठाचे विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. सचिन मुंबरे, डॉ. जयंत पळसकर, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. धनाजी बागल, डॉ. राजश्री नाईक उपस्थित होते. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या २ जूनपासून विविध विद्याशाखांच्या हिवाळी-२०२० पदवी परीक्षा विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या उन्हाळी-२०२१ परीक्षा २४ जूनपासून नियोजित होत्या. या परीक्षा यापूर्वीच पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

## कासवांची तस्करी करणारे ताब्यात

◆**ठाणे :** विवियाना मॉल परिसरात कासवांची तस्करी करणाऱ्या दोघांना वन विभागाने ताब्यात घेतले. जय मकवाणा आणि अनिकेत पुरबिया अशी ताब्यात घेतलेल्या तरुणांची नावे असून पथकाने त्यांच्याकडून दोन कासव जप्त केले आहेत . विवियाना मॉल परिसरात कासवांची तस्करी करणारे दोन जण येणार असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, वनक्षेत्रपाल नरेंद्र मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाच्या पथकाने जय आणि अनिकेत या दोघांना ताब्यात घेतले. पथकाने त्यांची झडती घेतली असता एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये दोन कासव आढळून आले. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना ताब्यात घेतले आहे. त्यांना १६ मेपर्यंत वन कोठडी मिळाल्याची माहिती वनक्षेत्रपाल नरेंद्र मुठे यांनी दिली.

## जनता, सरकारच्या बेफिकीरीमुळे फटका- भागवत

◆**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी कोरोनाची दुसरी लाट येण्यामागे जनता आणि सरकारच्या बेफिकिरीला जबाबदार धरले आहे. मात्र, आता नागरिकांनी पॉझिटिव्ह राहूनच या संकटाचा मुकाबला करायला हवा, असेही भागवत यांनी स्पष्ट केले आहे. 'पॉझिटिव्ह अनलिमिटेड' या कार्यक्रमाला मोहन भागवत संबोधित करत होते. पहिल्या लाटेनंतर सरकार आणि जनता बेफिकीर झाली होती. आता आपल्याला पॉझिटिव्ह राहावे लागेल. स्वत: कोविड निगेटिव्ह ठेवण्यासाठी सावधान राहावे लागणार आहे. तसेच सध्याची परिस्थिती पाहता तर्कहिन वक्तव्येही टाळावी लागणार आहेत. ही परीक्षेची वेळ आहे. मात्र, सर्वांना एकजूट राहावे लागेल. एक टीम म्हणून काम करावे लागेल, असे भागवत यांनी सांगितले. आता कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पण घाबरून जाऊ नका. आपण स्वत:ला तयार केले पाहिजे, असे ते म्हणाले.


## पश्चिम रेल्वे

**ई–प्रापण निविदा सूचना क्र. एस/१८/२०२१ दिनांक: १२.०५.२०२१**

| अनु.क्र. | बाबीचे संक्षिप्त वर्णन | परिमाण | टी.ओ.डी. |
|---|---|---|---|
| ३७४ | अनकपलिंग गियर साठी बेअरिंग पीस असेंब्ली | ६८७१ नग | २४.०५.२०२१ |
| ३७५ | एलईडी सिग्नल लायटिंग युनिट रूट, शंट कॉलिंग ऑन | १४३ नग | २७.०५.२०२१ |
| ३७६ | ॲक्सल बॉक्स साठी टॉप स्प्रिंग सीट | ९१२ नग | २७.०५.२०२१ |
| ३७७ | फियॅट आयआर बोगी साठी पिन | १६९४ नग | २७.०५.२०२१ |
| ३७८ | डिस्ट्रीब्यूटर वॉल्व्हज | २७५ नग | २७.०५.२०२१ |
| ३७९ | हाईट ॲडजेस्टमेंटसाठी पॅकिंग ३७ मिमी जाड | ११४५ नग | २७.०५.२०२१ |
| ३८० | हॅंड ब्रेक केबल असेंब्ली | ११४५ नग | २७.०५.२०२१ |
| ३८१ | अझिथरोमायसीन ५०० एमजी टॅब | २४५६७० नग | २७.०५.२०२१ |
| ३८२ | मेरोपेनेम १ जी इंज | ११८४० नग | २७.०५.२०२१ |
| ३८३ | पिपेरासिलीन ४ जी आणि टाझोबक्टेम ५०० एमजी इंज | २२९९४ नग | २७.०५.२०२१ |
| ३८४ | सोलिड एमआयजी/एमएजी कॉपर कोटेड | १८५०० नग | २८.०५.२०२१ |
| ३८५ | सॅंडविकचे इंडेक्सेबल इन्सर्ट | १९१ नग | २८.०५.२०२१ |
| ३८६ | १८ डब्ल्यू (४ फूट लांब) एलईडी टयूबलर लॅम्पस | ५११६ नग | २८.०५.२०२१ |
| ३८७ | चेअर कार साठी सेकंडरी स्प्रिंग | १०० नग | २८.०५.२०२१ |
| ३८८ | ब्रांच पाईप | ३० नग | २८.०५.२०२१ |
| ३८९ | फूट स्टेप अरेंजमेंट | ४३ संच | ३१.०५.२०२१ |
| ३९० | यो डॅंपर | ५७५ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९१ | सेकंडरी लॅटरल डॅंपर | ३३४ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९२ | प्रायमरी व्हर्टिकल डॅंपर | २२०० नग | ३१.०५.२०२१ |
| ३९३ | फूट रेस्ट कम्प्लीट | ८२ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९४ | सिक्युरिटी प्लेट | २६०० नग | ३१.०५.२०२१ |
| ३९५ | सिक्युरिटी प्लेट | ६१० नग | ३१.०५.२०२१ |
| ३९६ | ब्रेक सिलेंडर | ३३९ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९७ | अपग्रेडेड हाय टेन्सिल सीबीसी साठी योक | १०९३ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९८ | ब्रेक बीम कम्प्लीट | ५६८ नग | ३१.०५.२०२१ |
| ३९९ | स्लॅक ॲडजस्टर टाईप (बाब ४४) | ४०० नग | ३१.०५.२०२१ |
| ४०० | नॉन अस्बेस्टॉस के टाईप कॉम्पोझिशन ब्रेक ब्लॉक | ५३६०८ नग | ३१.०५.२०२१ |
| ४०१ | बीएमबीएस कॅसनब बोगी साठी पिन/ कोटर्स | २४० नग | ३१.०५.२०२१ |
| ४०२ | मॉडीफाईड फ्लॅप डोअर अरेंजमेंट | ६०० नग | ३१.०५.२०२१ |
| ४०३ | ऑटोमटिक ट्वीस्ट लॉक्स | १३३९ नग | ३१.०५.२०२१ |
| ४०४ | फ्लेक्सिबल पीव्हीसी फ्लोरिंग शीट | १२० नग | ०१.०६.२०२१ |
| ४०५ | सस्पेंशन क्लॅंप बॉडी | १००० नग | ०१.०६.२०२१ |
| ४०६ | ४१५ व्ही एसी ३ फेज टॉवर एसी सिस्टीम | १६४ नग | ०१.०६.२०२१ |
| ४०७ | ७/८ व्यास लॉक बोल्ट आणि कोलार | २१८५४ नग | ०१.०६.२०२१ |
| ४०८ | बीएमबीएस कॅसनब बोगीसाठी पिन/ कोटर्स | २४० नग | ०१.०६.२०२१ |
| ४०९ | १६८ व्यास होल शिवाय बोलस्टर बॉटम गेस्ट | ४ मग | ०१.०६.२०२१ |
| ४१० | फूट पेडल साठी सक्शन मशीन | १ नग | ०१.०६.२०२१ |
| ४११ | हेर्मेटिकली सिल्ड कॉम्प्रेसर कॉपेलॅंड | १३० नग | ०२.०६.२०२१ |
| ४१२ | ३ फेज इंडक्शन कंडेनसर मोटार | २५३ नग | ०२.०६.२०२१ |
| ४१३ | प्रीवेलिंग टोर्क प्रकार नट | ५६७ नग | ०२.०६.२०२१ |
| ४१४ | नीडल रोलर बेअरिंग असेंब्ली | २७१ नग | ०२.०६.२०२१ |
| ४१५ | बीएमबीएस कॅसनब बोगी साठी पिन/कोटर्स | २४० नग | ०२.०६.२०२१ |
| ४१६ | बीएमबीएस कॅसनब बोगी साठी पिन/कोटर्स | २४० नग | ०२.०६.२०२१ |
| ४१७ | बीएमबीएस कॅसनब बोगी साठी ब्रेक हेड पिन असेंब्ली | ४८० नग | ०२.०६.२०२१ |
| ४१८ | पीओएच कीट | २४०९ नग | ०२.०६.२०२१ |
| ४१९ | लोड सेन्सिंग डिव्हाईस | ५०६ नग | ०२.०६.२०२१ |
| ४२० | पीयू पेंट जेनेटीन ब्ल्यू | २२६०० नग | ०३.०६.२०२१ |
| ४२१ | १९३ चौ.मी. कॅटेनरी वायर | ४ किमी | ०३.०६.२०२१ |
| ४२२ | रबर बफर स्प्रिंग | ४५१ संच | ०३.०६.२०२१ |
| ४२३ | इंटरमिडीयट लॉंगीटयूडीनल बीम | १०० नग | ०३.०६.२०२१ |
| ४२४ | एअर स्प्रिंग असेंब्ली १८० केएन क्षमेतेचे | १४ नग | ०३.०६.२०२१ |
| ४२५ | मिल्क व्हॅन साठी ॲक्सल बॉक्स हेलिकल स्प्रिंग | ६५ नग | ०३.०६.२०२१ |
| ४२६ | पीओएच कीट | ५९४ नग | ०३.०६.२०२१ |
| ४२७ | वेंट शिवाय आयसोलेटिंग कॉक | १३१ नग | ०३.०६.२०२१ |

इरठे, खरेदी बंधने आणि तपशिलवार निविदा अटी असलेल्या तपशिलवार सूचनेच्या संदर्भात कृपया **www.ireps.gov.in** आणि **www.wr.indianrailways.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

**प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक,**

106

आम्हाला लाईक करा: www.facebook.com/WesternRly – आम्हाला फॉलो करा: www.twitter.com/WesternRly



## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

### जाहिर आवाहन

"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ मधील तरतुदीअन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील काही इमारतींना" धोकादायक" घोषित करण्यात आलेले आहे. सदर इमारतीतील रहिवाशांना त्यांची निवासस्थाने रिक्त करण्याकरिता महापालिकेकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापी, काही इमारतीमध्ये अजूनही नागरिक वास्तव्यास आहेत. धोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्यांच्या इमारतीचा ताबा त्वरीत सोडून, सदर इमारत स्वत:हून निष्कासित करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवित व वित्तहानी झाल्यास त्याबाबतची जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधीत नागरिकांची राहील. त्याकरिता महापालिका जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर 'धोकादायक/अतिधोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतीची प्रभाग समिती निहाय यादी उल्हासनगर महानगरपालिकेच्या **www.umc.gov.in** या संकेतस्थळावर **List of Dangerours Buildings** या शिर्षकाखाली उपलब्ध असून, नागरिक आपली इमारत धोकादायक/अतिधोकादायक घोषित केलेल्या यादीमध्ये आहे किंवा नाही याची खात्री करु शकतात.

**वास्तव्यास असणारी इमारत ढोबळमानाने अतिधोकादायक झाली आहे, याबाबत काही प्राथमिक लक्षणे आढळून येतात, ती खालीलप्रमाणे,**

१. इमारतीच्या आर. सी. सी. फ्रेम, कॉलम, बीम, स्लॅब इत्यादीच्या रचनेत बदल होत असल्याचे आढळल्यास उदा.
- इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसून आल्यास....
- इमारतीचे बीम झुकल्यासारखे दिसून आल्यास.....
- इमारतीची स्लॅब झुकल्यासारखे दिसून आल्यास.....

२. इमारतीच्या तळमजल्याचा भाग खचल्यासारखा दिसून आल्यास....
३. इमारतीच्या कॉलममधील भेगा वाढत असल्यास दिसून आल्यास.....
४. इमारतीच्या कॉलममधील कॉंक्रीट पडत असल्याचे दिसून आल्यास....
५. इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.....
६. इमारतीच्या आर. सी. सी. चेंबर्स (कॉलम, बीम) व विटांची भिंती यातील साधा/भेगा वाढत असल्यास.....
७. स्लॅबचे किंवा बीमचे तळमजल्याचे कॉंक्रीट पडत असल्यास.....
८. इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठ्या प्रमाणात भेगा असल्यास.....
९. इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास.....
१०. इमारतीच्या स्लॅब, बीम, कॉलमच्या भेगामुळे लोखंडी शिगांचा आकार गंजल्यामुळे कमी झालेला असल्यास....

**अशा परिस्थितीत वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांनी काय काळजी घ्यावी.**

१. उल्हासनगर महानगरपालिकेच्या २४x७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या ०२५१–२७२०१४३, २७२०१४९ अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३११०१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
२. सदर इमारत तातडीने रिकामी करावी.
३. आजूबाजूच्या इमारतीतील रहिवाशांनासुध्दा सतर्क राहण्यास अवगत करावे.
४. तातडीने तज्ञ आर. सी. सी. तांत्रिक सल्लागार यांना दाखवून प्रॉप्स/टेकू लावण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवित व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्व जण जबाबदार नागरिक म्हणून आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना आपणास टाळता येतील,

जा.क्र./उमपा/पिआरओ/२२४/२०२१
दि. १४/०५/२०२१

सही/–
(डॉ. राजा दयानिधी) भा.प्र.से.
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका



## पश्चिम रेल्वे

**पिण्याच्या पाण्याचा पुरवठा**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल, मुंबई–४०० ००८ खाली देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार ई–निविदा मागवित आहेत: **कार्यकारी:** डीईएन: (इस्टेट/दक्षिण) बीसीटी, **निविदा सूचना क्र. आणि दिनांक:** बीसीटी/२१–२२/४४ दि. १३–०५–२०२१, काम आणि ठिकाण: चर्चगेट –२४ महिन्यांच्या कालावधीसाठी बीएमसीचा पाणी पुरवठा अपुरा होण्याच्या संदर्भात सीसीजी स्थानक इमारत, ए आणि बी ब्लॉक अधिकारी सदनिका आणि विश्रांती गृह येथे टॅंकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. **कामाचे अंदाजे मूल्य रु. मध्ये:** ६०५०७६४.८, **इरठे रु.:** ०, **सादरीकरण दिनांक आणि वेळ:** ०८–०६–२०२१ रोजी १५.०० वा. पर्यंत. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** ०८–०६–२०२१ रोजी १५.३० वा. कामाचे तस्तम स्वरूप, निविदा कागदपत्राचे शुल्क (ना–परतावा), इरठे, पात्रता निकष, कामाचे तस्तम स्वरूप, तपशिलवार निविदा अटींसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. 105

आम्हाला लाईक करा: www.facebook.com/WesternRly



## पश्चिम रेल्वे

**ढोबळ जाहिरात अधिकाराचे काम**

**विभाग:** वाणिज्य **कार्यकारी:** वरी. डीसीएम, **ई–निविदा सूचना क्र. आणि दिनांक:** सीए११_बल्क स्टेशन_बीव्हायआर_२०२१ ई–फाईल क्र. डब्ल्यूआर– एमएमसीटी०सीओ एमएम/एमएमसीटी/डब्ल्यूआर कम्प्युटर क्र. १६४३०१ दिनांकित १२.०५.२०२१, **काम आणि ठिकाण:** एक वर्ष कालावधीसाठी भाईंदर स्थानकाच्या ढोबळ जाहीरात अधिकारांसाठी निविदा. **कामाचे अंदाजे मूल्य रु. :** रु. ३१,५१,२९६/– (कर इत्यादी वगळता), इरठे रु.: रु. ६३,१००/–, संकेतस्थळ जिथे निविदा अर्ज उपलब्ध: **www.ireps.gov.in** ऑन लाईन सादरीकरण समाप्तीचा दिनांक आणि वेळ: १०.०६.२०२१ रोजी १५.३० वा., टिप: निविदा कागदपत्रे, शुद्धिपत्रक आणि अधिक माहिती डाऊनलोड करण्यासाठी कृपया **www.ireps.gov.in** या आमच्या संकेतस्थळाला भेट द्या. निविदा कागदपत्राचे शुल्क आणि इरठे केवळ ऑन लाईन नेट बॅंकिंग किंवा ई–पेमेंट गेटवे द्वारेच स्विकारण्यात येईल. बोलीदारांनी अधिक नवीन माहितीसाठी नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी. 0102

आम्हाला लाईक करा: www.facebook.com/WesternRly



**महत्वाचे** जाहिरात प्रतीच्या स्वीकृतीआधी जरी काळजी घेण्यात येत असली तरी त्यांच्यातील समाविष्ट बाबी तपासून पाहणे शक्य नाही . अशा समाविष्ट बाबींसाठी **'आपलं महानगर'** वृत्तपत्र, मुंबई यांना त्यांच्या वृत्तपत्रे किंवा प्रकाशनांमधील कंपन्या , संस्थांच्या किंवा व्यक्तिगत जाहिरातींसोबत झालेल्या व्यवहाराच्या परिणामस्वरूपी उद्भवलेल्या कोणताही तोटा किंवा नुकसानीस जबाबदार धरता येणार नाही. म्हणूनच आम्ही वाचकांना शिफारस करतो की त्यांनी जाहिरातींच्या संधर्भामधे जे असेल त्या स्वरूपामध्ये जाहिरातदार किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणताही पैशांची रक्कम पाठवण्यापूर्वी किंवा त्यांच्याशी कोणताही करार करण्यापूर्वी आवश्यक चौकशी करावी.



## आरती ड्रग्स लि.

नोंदणी. कार्या.: प्लॉट क्र. एन–१९८, एमआयडीसी, तारापूर, गाव पामटेम्भी, जिल्हा पालघर ४०१५०६, महाराष्ट्र,
सीआयएन: एल३७०६०एमएच१९८४पीएलसी०५५४३३, ई– मेल आयडी: inestorrelations@aartidrugs.com संकेतस्थळ: www.aartidrugs.co.in

**३१ मार्च २०२१ रोजी संपलेले त्रैमासिक आणि वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

(समभाग वगळता रु. लाखांमध्ये)

| तपशिल | एकमेव | | | | | एकत्रिकृत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वार्षिक | |
| | ३१.०३.२०२१ (लेखापरीक्षित) | ३१.१२.२०२० (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२० (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२१ (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२० (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२१ (लेखापरीक्षित) | ३१.१२.२०२० (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२० (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२१ (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०२० (लेखापरीक्षित) |
| एकूण उत्पन्न | ४५,२९३ | ४७,६१७ | ४०,७१९ | १,९२,१३१ | १,६३,५९८ | ५०,२७२ | ५३,२२६ | ४५,०६३ | २,१५,९३० | १,८०,७५७ |
| कालावधीसाठीएकूण नफा (कर, अपवादात्मक आणि/ किंवाअति विशिष्ट बाबी वगळता) | ६,६२४ | ८,४९३ | ४,८९८ | ३३,७४९ | १६,६६० | ६,५२५ | ९,०१४ | ५,२३४ | ३६,८७९ | १८,०८२ |
| अपवादात्मक बाबी | – | (२२) | (८३८) | (२२) | (८३८) | – | (२२) | (८३८) | (२२) | (४४७) |
| कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मकआणि/ किंवाअतिविशिष्टबाबींनंतर) | ५,०२४ | ६,४६६ | ५,६५६ | २५,७७१ | १३,५६७ | ५,१६५ | ६,८०३ | ५,८८६ | २८,०४० | १४,१४० |
| अन्य सर्व्कांष्ण उत्पन्न (कर पश्चात) | ३४१ | – | १७३ | ३४१ | १७७ | ३४१ | – | १७३ | ३४१ | १७७ |
| कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न | ५,३६५ | ६,४६६ | ५,८२९ | १६,११२ | १३,७४५ | ५,५०६ | ६,८०३ | ६,०५८ | २८,३८१ | १४,३१७ |
| संगणनेसाठीवापरल्या जाणाऱ्या समभागांचीभारीतसरासरीसंख्या | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| प्रती भाग उत्पन्न (रु. १०/– प्रत्येकी दर्शनी मूल्य असलेले)) | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० | ९,३२० |
| प्रतीसमभाग उत्पन्न (रु. मध्ये) (वार्षिकीकरण नाही) | | | | | | | | | | |
| (ए) मूळ | ५.३९ | ६.९४ | ६.०७ | २७.६५ | १४.५३ | ५.५४ | ७.३० | ६.३२ | ३०.०९ | १५.१४ |
| (बी) सौम्यीकृत | ५.३९ | ६.९४ | ६.०७ | २७.६५ | १४.५३ | ५.५४ | ७.३० | ६.३२ | ३०.०९ | १५.१४ |

**टिप:**
१. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठीचे वरील निष्कर्षाचे लेखा समितीद्वारे समीक्षणकरण्यात आले आहे संचालक मंडळाने १५ मे २०२१ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये ते संमत केले आहेत.
२. सप्टेंबर २०, २०२० रोजी घेण्यात आलेल्या टपाली मतदानाद्वारेसभासदांनी नोंदविलेल्या संमतीच्या अनुसार ऑक्टोबर१, २०२०च्या नोंद दिनांकाच्या अनुसार कंपनीच्या समभाग धारकांच्या द्वारे करण्यात आलेल्या प्रत्येकी १ समभागासाठी ३ समभागांच्या गुणोत्तरामध्ये ऑक्टोबर ५, २०२० रोजी प्रत्येकी रु. १०/– चे६,९९,००,००० चे वाटप केले आहे.
३. इंडएएस ३३च्या तरतुदीच्या अनुसार संपलेल्या कालावधीसाठी थकीतसमभागांची संख्या आणि संपलेल्या कालावधीसाठीपूर्ण भरणा केलेल्या प्रत्येकी १ समभागासाठी बोनससमभाग म्हणून ३:१ म्हणजेच ३(तीन) बोनस समायोजित करण्यात आले आहेत.
४. कंपनीचाकेवळ एकच व्यवसाय आहे म्हणजेचफार्मास्युटिकल
५. आवश्यक तेथे गत त्रैमासिकाचे आकडे पुनर्रचितकिंवा पुनर्गठीत करण्यात आले आहेत.
६. वरीलनिष्कर्षकंपनीच्या संकेतस्थळ **www.aartidrugs.com** वर अपलोड करण्यात आले आहेत आणि बीएसई लिमिटेड च्या **www.bseindia.com** आणि नशनल स्टक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या **www.nseindia.com** वर समभागधारक आणि लाभार्थी ह्यांच्या लाभासाठीउपलब्ध करून देण्यात येईल.

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** १५मे, २०२१

आरती ड्रग्ज लिमिटेड, करीता
सही/–
हरीत पी. शाह
पूर्ण–वेळ संचालक

